वसई विरार शहर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दिनांक 26/07/2019

सभा सुचना क्रं. 06

अु क्र.	विषयाचे नाव	स्थायी समिती सभेचा निर्णय
1.	प्रभाग समिती जी मधील वॉर्ड क्र.89 मध्ये कामण येथील प्रभाकर म्हात्रे यांचे घर ते खाटीक बेडा रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे कामी प्राप्त निविदापैकी लघुत्तम निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.	**ठराव :-** सदर विषयाबाबत सविस्तर चर्चा करण्यांत आली व मे. बालाजी कस्ट्रक्शन यांच्या 9.99% कमी दराच्या निविदेस मान्यता देण्यांत येत असून मे.बालाजी कन्स्ट्रक्शन यांच्याशी कामाची संविदा करण्यास ही सभा मंजूरी देत आहे. **अनुमोदक :- मा.श्रीम. दिक्षा घरत सूचक :- मा.श्री. कल्पेश मानकर** **ठराव सर्वानुमते मंजूर**
2.	वसई विरार शहर महानगरपालिका महिला व बालकल्याण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती पुस्तिका तयार करण्यास येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.	**ठराव :-** सदरच्या विषयावर सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली असून महिला व बालकल्याण समितीच्या शिफारशीनुसार महिला व बालकल्याण विभागामार्फत राबविण्यांत येणाऱ्या विविध योजनांची माहिती पुस्तिका तयार करण्यात यावी. महानगरपालिका राबविण्यांत येणाऱ्या योजनांची माहिती शहरातील नागरीकांना जास्तीत जास्त लोकांना माहिती व्हावी यासाठी मा.सभापती महिला व बालकल्याण समिती यांनी दि. 25/07/2019 च्या पत्रान्वये 3800 पुस्तिका छपाईमध्ये वाढ करून 5,000 पुस्तिका छपाई करावेत असे कळविले आहे. तरी यांची उपसुचना मान्य करून महानगरपालिकेच्या वार्षिक मंजूर ठेकेदारमार्फत 5,000 पुस्तिका छपाई करून घेण्यांत यावी. सदरचे 5,000 नग पुस्तिके छपाई करून घेण्याकरीता अंदाजे येणाऱ्या 15,00,000/- (पंधरा लाख रूपये मात्र) खर्चास ही सभा सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. **अनुमोदक :- मा.श्री.किशोर ना. पाटील सूचक :- मा.श्री. पंकज ठाकूर** **ठराव सर्वानुमते मंजूर**
3.	जि.प.शाळेतील मुलांना क्रिडा साहित्य वाटप करणेबाबत.	**ठराव :-** सदरच्या विषयावर सभागृहात सविस्तर चर्चा करण्यात आली असून महिला व बालकल्याण समितीच्या शिफारशीनुसार महानगरपालिका हद्दीतील जि.प.शाळेतील विद्यार्थ्यांना गोषवाऱ्यात नमुद केल्याप्रमाणे विद्यार्थ्यांना 1 क्रीडासंच देण्यात यावा. याकरीता ई-निविदा प्रक्रीया करून साहित्य खरेदीकामी अंदाज येणाऱ्या 12,00,000/- (बारा लाख रूपये) खर्चास ही सभा सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. **अनुमोदक :- मा.श्रीम.दिक्षा घरत सूचक :- मा.श्री. पंकज ठाकूर** **ठराव सर्वानुमते मंजूर**

4.	**महानगरपालिका हद्दीत विविध ठिकाणी महिलांना मार्गदर्शन मेळावा आयोजन करणेबाबत.**	**ठराव :-** सदरच्या विषयावर सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली असून मा.महिला व बालकल्याण समितीच्या शिफारशीनुसार सन 2019-20 या वित्तीय वर्षाकरीता महानगरपालिका हद्दीत विविध ठिकाणी महिलांना मार्गदर्शन मेळावे घेण्यांत यावे. या कार्यक्रमाचे आयोजन करण्याकरीता लागणारे साहित्य महानगरपालिकेच्या मंजूर निविदाधारकांकडून घ्यावे व ज्याबाबी मंजूर निविदेमध्ये नाहीत, त्याकरीता महानगरपालिकेच्या संकेतस्थळावरती दरपत्रक प्रसिध्दी करून कार्यक्रमाचे आयोजन करण्यांत यावे. याकरीता अंदाजे येणाऱ्या 9,00,000/- रूपये अक्षरी (नऊ लक्ष रूपये मात्र) खर्चास ही सभा सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. **अनुमोदक :- मा.श्रीम. दिक्षा घरत सूचक :- मा.श्री. नितीन राऊत** **ठराव सर्वानुमते मंजूर**
5.	**महानगरपालिका हद्दीत विविध ठिकाणी बालमेळावे आयोजित करणेबाबत.**	**ठराव :-** सदरच्या विषयावर सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली असून मा. महिला व बालकल्याण समितीच्या शिफारशीनुसार सन 2019-20 या वित्तीय वर्षात महानगरपालिका हद्दीत विविध ठिकाणी बालमेळाव्याचे आयोजन करण्यांत यावे. या कार्यक्रमाचे आयोजन करण्याकरीता लागणारे साहित्य महानगरपालिकेच्या वार्षिक मंजूर ठेकेदारामार्फत घ्यावे व ज्याबाबी वार्षिक ठेक्यात मंजूर नाही. त्याकरीता ई-निविदा प्रक्रिया करण्यांत यावी. महानगरपालिका हद्दीत 27 ठिकाणी बालमेळाव्याचे आयोजन करण्याकरीता अंदाजे येणाऱ्या 29,00,000/- रूपये अक्षरी (एकोणतीस लक्ष रूपये मात्र) खर्चास ही सभा सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. **अनुमोदक :- मा.श्रीम.दिक्षा घरत सूचक :- मा.श्री. कल्पेश मानकर** **ठराव सर्वानुमते मंजूर**
6.	**सन 2020-21 या वित्तीय वर्षात म.न.पा हद्दीतील अंगणवाडी/बालवाडीतील मुलांना शैक्षणिक साहित्य पुरवठा करणेबाबत.**	**ठराव :-** वरील विषयाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली असून सन 2020-21 या वित्तीय वर्षात दप्तर वाटप, टिफीन, बॉटल, टिफीन बॉक्स, संतरंजी पट्ट्या व लहान लोंखंडी कपाट इ. उपयोगी साहित्य वाटपाबाबत योग्य तो निर्णय मा.सभापती महिला व बालकल्याण समितीने घ्यावा. सदरचे साहित्य वाटप करण्याकरीता महानगरपालिकेच्या वाहन विभागामार्फत वाहने व मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यांत यावे. उद्योग, उर्जा व कामगार व विभाग शासन निर्णय क्र. भांखल-2014/ प्र.क्र.82/भाग-III/उद्योग-4 मादामा कामा रोड, हुतात्मा, राजकुरू चौक, मंत्रालय मुंबई, 400032 दि. 01 डिसेंबर 2016 च्या शासन निर्णयानुसार ई-निविदा प्रक्रिया करण्याकरीता व या अनषंगिक अंदाजे येणाऱ्या 50,00,000/- (अक्षरी रू. पन्नास लाख मात्र) खर्चास ही सभा सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. **अनुमोदक :- मा.श्रीम. दिक्षा घरत सूचक :- मा.श्री. नितीन राऊत** **ठराव सर्वानुमते मंजूर**

7.	**सन 2019-20 या वित्तीय वर्षाकरीता महानगरपालिका हद्दीत समाविष्ट असलेल्या जि.प. शाळेतील विद्यार्थ्यीनींना व अनाथ आश्रमातील विद्यार्थ्यीनींना सॅनिटरी नॅपकीन पुरवठा करणेकामी कमी दराच्या निविदाधारकाच्या दरास मंजूरी देऊन कमी व योग्य दराच्या निविदाधारकासोबत संविदा करण्यास मान्यता देण्याबाबत.**	**ठराव :-** सदरच्या विषयावर सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली असून मा.महिला व बालकल्याण समितीच्या शिफारशीनुसार महानगरपालिका हद्दीतील जि.प.शाळेतील इ. 5 वी ते 8 वी च्या विद्यार्थीनीना व आश्रमशाळेतील विद्यार्थीनीना सॅनिटरी नॅपकीन पुरवठा करण्याकरीता श्री. गजानन मेडीकल स्टोअर्स स्टोअर्स यांचा प्रती नग दर रू. 30.00 मंजूर करण्यात येत आहे. तसेच गटशिक्षण अधिकारी, पंचायत समिती, वसई यांचेकडून प्राप्त होणाऱ्या विद्यार्थ्यांनीच्या यादीनुसार सॅनिटरी नॅपकीन मागविण्यात यावी. त्यानुसार महाराष्ट्रात महानगरपालिका अधिनियम 73 (क) अन्वये सर्वात कमी दराच्या निविदाधारकासोबत संविदा करण्यास व जि.प.शाळेतील इ. 5 ते 8 वी च्या विद्यार्थ्यींनीना व आश्रमातील विद्यार्थ्यींनीना सॅनिटरी नॅपकीन खरेदी करण्याकरीता येणाऱ्या 26,40,000/- रूपये (अक्षरी सव्वीस लक्ष चाळीस हजार रूपये मात्र) खर्चास ही सभा सर्वानुमते मान्यता देत आहे. **अनुमोदक :- मा.श्रीम.दिक्षा घरत सूचक :- मा.श्री. पंकज ठाकूर** **ठराव सर्वानुमते मंजूर**
8.	**सन 2019-20 ते सन 2021-22 या वित्तीय वर्षासाठी महानगरपालिकेचा ''पर्यावरण सद्यस्थिती अहवाल'' तयार करणेस मंजुरी मिळणेबाबत.**	**ठराव :-** उपरोक्त प्रस्तावावर सभेत सविस्तर चर्चा करण्यांत आली. सदर चर्चेमध्ये सन 2019-20, सन 2020-21 व सन 2021-22 या तीन वर्षाचा पर्यावरण अहवाल तयार करण्यासाठी प्रतिवर्षी अंदाजे रक्कम रू. 17,00,000/- लक्ष प्रमाणे येणाऱ्या खर्चास व 3 वर्षाकरीता निविदा प्रक्रिया करण्यास ही सभा सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. **अनुमोदक :- मा.श्रीम.दिक्षा घरत सूचक :- मा.श्री. नितीन राऊत** **ठराव सर्वानुमते मंजूर**
9.	**राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धेत प्राविण्य मिळविलेल्या खेळाडुंना बक्षिस पर वित्त सहाय्य अदा करणेबाबत.**	**ठराव :-** वरील प्रस्तावावर सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली. त्यानुसार मा.सर्वसाधारण ठराव क्र. 05 दिनांक 14/07/2017 च्या सर्वसाधारण नियमावलीची अटी व शर्तीनुसार वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पदक प्राप्त व स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या पंरतु कोणतेही पदक मिळवू न शकलेल्या स्पर्धकाला प्रोत्साहनपर अनुदान असे प्रस्तावातील वित्त साहाय्य मागणी अर्ज क्र. 1 ते अर्ज क्र. 8 अशा एकूण 08 खेळाडूंना रोख बक्षिस देवून गौरविण्याच्या योजनेची मंजूर नियमावलीच्या अनुषंगाने वित्त सहाय्य देणेकामी ही सभा मंजूरी देत आहे व त्याकामी होणाऱ्या खर्चास ही सभा सर्वानुमते आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे. **अनुमोदक :- मा.श्रीम. दिक्षा घरत सूचक :- मा.श्री. पंकज ठाकूर** **ठराव सर्वानुमते मंजूर**

10	**सन 2019 च्या पावसाळयात शहर विविध ठिकाणी वृक्षारोपण करणेकामी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.**	**ठराव :-** उपरोक्त प्रस्तावावर सभेत सविस्तर चर्चा करण्यांत आली. सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार प्रभाग समिती निहाय वृक्ष लागवडीचा कार्यक्रम राबविण्यासाठी उद्यान सुशोभिकरण (बी-2 निविदा क्र. 7681) कामाच्या पॅनलवरती मंजूर ठेकेदारामार्फत वृक्ष लागवड करणेस तसेच सदर कामी होणाऱ्या एकूण रक्कम रू. 39,84,000/- (अक्षर रू. एकोणचाळीस लक्ष चौऱ्यांऐशी हजार मात्र) इतक्या खर्चास ही सभा सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. **अनुमोदक :- मा.श्रीम.दिक्षा घरत सूचक :- मा.श्री. नितीन राऊत** **ठराव सर्वानुमते मंजूर**
11.	**प्रभाग समिती (ड) 96 मधील ऋ षभ टॉवर जवळ समाज मंदिर बांधणेचे काम रद्द करणेबाबत.**	**ठराव :-सदरचे** काम रद्द करणेस व याकामी ठेकेदार मे.श्री. एंटरप्रायझेस यांनी महानगरपालिकेकडे भरलेली इसारा व सुरक्षा अनामत रक्कम परतावा करणेस ही सभा मंजूरी देत आहे. **अनुमोदक :- मा.श्रीम.दिक्षा घरत सूचक :- मा.श्री. नितीन राऊत** **ठराव सर्वानुमते मंजूर**
12.	**प्रभाग समिती (बी) कार्यक्षेत्रातील नालासोपारा (पू) मधील प्रभाग क्र.39 मधील गजानन अपा. ते नालासोपारा विरार लिंक रोड पर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे कामास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत.**	**ठराव :-वरीलप्रमाणे** प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमुद कामाच्या रू. 63,72,237/- रक्कमेच्या अंदाजपत्रकास ही सभा मंजूरी देत आहे व तसेच पुढील आवश्यक निविदा कार्यवाही करण्यास मान्यता देत आहे. **अनुमोदक :- मा.श्रीम.दिक्षा घरत सूचक :- मा.श्री. किशोर ना.पाटील** **ठराव सर्वानुमते मंजूर**
13.	**प्रभाग समिती जी मधील वॉर्ड क्र.76 मध्ये वालिव विभागीय कार्यालयाच्या तिसऱ्या मजल्यावर सभागृह बांधणे कामाचे अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत.**	**ठराव :-वरीलप्रमाणे** प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा करणेंत आली. सदर कामाच्या रक्कम रू. 64,38,238/- च्या अंदाजपत्रकास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे. याकामी निविदा दर मागविण्यांत यावेत असे ही सभा ठरविते. **अनुमोदक :- मा.श्रीम. दिक्षा घरत सूचक :- मा.श्री. किशोर ना.पाटील** **ठराव सर्वानुमते मंजूर**
14.	**कोपरी तलाव सुशोभिकरण करणे. (आमदार फंड सन 2015-16)**	**ठराव :-** सदर कामास मा.स्थायी समिती सभा विषय/ठराव क्र. ----------दि. ---------- अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यांत आली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करून सकारात्मकदृष्ट्या मे.हिरालाल डी.सोनार ह्यांचा निविदा दर लघुत्तम आहे. महाराष्ट्र महापालिका अधिनियम 1949 चे कलम 73 (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देण्याकरीता मा.आयुक्त

		ह्यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. या ठरावान्वये मा.स्थायी समिती महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73 (क) अन्वये संविदा करणेस मान्यता देत आहे. **अनुमोदक :- मा.श्रीम. दिक्षा घरत सूचक :- मा.श्री. किशोर ना.पाटील** **ठराव सर्वानुमते मंजूर**
15.	**प्रभाग समिती एफ क्षेत्रातील प्रभाग क्र.05 शिरसाड येथे दिवापाडा येथे अंतर्गत पेव्हर ब्लॉक बसविणे कामी या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजुर करुन संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत.**	**ठराव :-** सदर विषयाबाबत सभागृहात साधक-बाधक चर्चा करण्यांत आली. सदर कामी मे.मेहता कार्पोरेशन यांची निविदा 15.00% कमी दराने ही प्राप्त निविदामध्ये लघुत्तम दराची आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73 (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देण्याकरीता मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. मा.आयुक्त यांचे शिफारशीनुसार मा.स्थायी समिती महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम (क) अन्वये संविदा करणेस ही सभा मान्यता देत आहे. **अनुमोदक :- मा.श्रीम. दिक्षा घरत सूचक :- मा.श्री. नितीन राऊत** **ठराव सर्वानुमते मंजूर**
16.	**प्रभाग समिती एफ क्षेत्रातील प्रभाग क्र. 05 कोपर गाव येथे कोपर मराठी शाळा ते स्मशानभुमी रस्तापर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे. कामी या कामी प्राप्त निविदापैंकी लघुत्तम दराची निविदा मंजुर करुन संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत.**	**ठराव :-** सदर विषयाबाबत सभागृहात साधक-बाधक चर्चा करण्यांत आली. सदर कामी मे. श्री.सद्गुरू कन्स्ट्रक्शन यांची निविदा 0.01% कमी दराने ही प्राप्त निविदामध्ये लघुत्तम दराची आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73 (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देण्याकरीता मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. मा.आयुक्त यांचे शिफारशीनुसार मा.स्थायी समिती महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम (क) अन्वये संविदा करणेस ही सभा मान्यता देत आहे. **अनुमोदक :- मा.श्रीम.दिक्षा घरत सूचक :- मा.श्री.किशोर ना.पाटील** **ठराव सर्वानुमते मंजूर**
17.	**प्रभाग समिती एफ धानिव /पेल्हार क्षेत्रातील प्रभाग समिती - एफ धानिव/पेल्हार क्षेत्रातील प्रभाग क्र.42 मध्ये धानिव येथे कातकरीपाडा क्रॉसिंग पासुन ते शान बार येथील मुख्य गटारापर्यंत गटार बांधणे व पेव्हर ब्लॉक बसविणे. कामी या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजुर संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत.**	**ठराव :-** सदर विषयाबाबत सभागृहात साधक-बाधक चर्चा करण्यांत आली. सदर कामी मे. कांचन कन्स्ट्रक्शन यांची निविदा 0.50% कमी दराने ही प्राप्त निविदामध्ये लघुत्तम दराची आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73 (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता मा.आयुक्त यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. मा.आयुक्त यांचे शिफारशीनुसार मा.स्थायी समिती महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73 (क) अन्वये संविदा करणेस ही सभा मान्यता देत आहे. त्यानुसार येणाऱ्या खर्चास व त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास ही सभा मान्यता देत आहे. **अनुमोदक :- मा.श्रीम.दिक्षा घरत सूचक :- मा.श्री.किशोर ना.पाटील** **ठराव सर्वानुमते मंजूर**

18.	**प्रभाग समिती एफ क्षेत्रातील खैरपाडा येथे खैरपाडा झेड पी शाळेपासुन ते नाल्यापर्यत आर.सी.सी. पाईप गटार बांधणे कामी या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजुर करुन संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत.**	**ठराव :-** सदर विषयाबाबत सभागृहात साधक-बाधक चर्चा करण्यांत आली. सदर कामी मे. विनायक ब्रिजे यांची निविदा 12.00% कमी दराने ही प्राप्त निविदामध्ये लघुत्तम दराची आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73 (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देण्याकरीता मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. मा.आयुक्त यांचे शिफारशीनुसार मा.स्थायी समिती महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम (क) अन्वये संविदा करणेस ही सभा मान्यता देत आहे. **अनुमोदक :- मा.श्रीम.दिक्षा घरत सूचक :- मा.श्री. कल्पेश मानकर** **ठराव सर्वानुमते मंजूर**
19	**वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती जी कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र.91 मध्ये मडवीपाडा ते भोयदापाडा - राजावली मुख्य रस्त्यापर्यंतचा रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.**	**ठराव :-** सदर विषयाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली. मे. द्वारका कन्स्ट्रक्शन यांच्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा 13.11% कमी दराच्या निविदेस निविदा समितीने मान्यता दिली आहे. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73 (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस मा.आयुक्त यांनी मंजूरी दिली आहे. याकामी मनपातर्फे कायदेशीर बाबींची पुर्तता करून संविदा करणेसाठी ही सभा मान्यता देत आहे व याकामी येणाऱ्या खर्चास अंतिम प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. **अनुमोदक :- मा.श्रीम.दिक्षा घरत सूचक :- मा.श्री. कल्पेश मानकर** **ठराव सर्वानुमते मंजूर**
20	**महानगरपालिकेच्या प्रभाग समिती एच कार्यक्षेत्रातील नवघर येथील के.टी. रोड प्राथमिक आरोग्य केंद्राजवळ महानगरपालिका मालकीचे सुलभ शौचालय चालविणे/देखभाल करणेस मुदतवाढ देणेबाबत.**	**ठराव :-** प्रस्तावाचा मजकूर पाहता वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती एच मधील प्राथमिक आरोग्य केंद्र नवघर येथील के.टी.रोडवर तत्कालीन नवघर-माणिकपूर नगरपरिषदेने बांधा, वापरा व हस्तांतरण करा या तत्वावर प्रस्ताव मागविलेले होते. त्यापैकी अध्यक्ष श्री.साई सेवा चॅरीटेबल संस्था, मुंबई यांचा प्रस्ताव मंजूर केलेला होता. सदर मंजूर प्रस्तावानुसार 9 वर्षे कालावधी होता. सदर शौचालय चालविणेची मुदत दि. 30/05/2017 पर्यंत होती. बी.ओ.टी. धारकांनी पुनश्च मुदतवाढ मिळणेस दि. 13/09/2017 च्या अर्जाद्वारे विनंती केलेली आहे. तसेच बी. ओ.टी. धारकास मुदतवाढ देणेचा बांधकाम विभागाकडील प्रस्ताव पाहता शौचालय संदर्भात साफ-सफाईच्या दृष्टीने कोणतीही तक्रार आलेली नाही. तसेच या संस्थेने महानगरपालिकेस स्वखर्चाने शौचालय बांधून दिलेले होते. याचा विचार करता त्यांना मुदत संपल्यापासून पुनश्च 9 वर्षासाठी शौचालय देखभाल/चालविणेस मुदतवाढ देणेस तसेच सद्या आकारीत असलेल्या भाड्यात 50% वाढ करून देणेस ही सभा मंजूरी देत आहे. **अनुमोदक :- मा.श्रीम. दिक्षा घरत सूचक :- मा.श्री. किशोर ना.पाटील** **ठराव सर्वानुमते मंजूर**

21	सन 2019-20, सन 2020-21 व सन 2021-22 हया वित्तीय वार्षीक वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिकेच्या विविध स्मशानभुमीकरीता कास्ट आयर्नच्या शवदाहीन्या पुरवठा करणे.	**ठराव :-** सदर कामास मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.15 दि.15/11/2018 रोजी आर्थिक व प्रशासकिय मान्यता दिली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करुन सकारात्मक दृष्ट्या पाहता मे.गायत्री इंजिनिअरर्स यांचे निविदा दर सन 2019-20,सन 2020-21, सन 2021-22 करीता (वाटाघाटी अंती) सर्वात कमी निविदा दर प्राप्त झाले असुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम (क) अन्वये या कमी दराच्या निविदेस संविदा करणेस देणेकरीता मा.आयुक्त यांनी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस केली आहे. मा.आयुक्त यांच्या शिफारशीनुसार संविदा करणेस ही सभा मान्यता देत आहे. **अनुमोदक :- मा.श्रीम. दिक्षा घरत सूचक :- मा.श्री. कल्पेश मानकर** **ठराव सर्वानुमते मंजूर**
22	प्रभाग समिती एफ धानिव/पेल्हार क्षेत्रातील वॉर्ड क्र.05 मधील कशीद येथील स्वाध्याय मंदीर परिसरात पेव्हर ब्लॉक बसविणे कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत कामाला प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.	**ठराव :-** सदर विषयाबाबत सभागृहात साधक-बाधक चर्चा करण्यांत आली. त्यानुसार सदर काम करणेस व सदर कामाच्या अंदाजपत्रकीय रक्कम रू. 15,48,766/- इतक्या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. सदर कामी विहीत प्रणालीनुसार निविदा मागविणेस व त्याअनुषंगाने येणाऱ्या रू. 15,48,766/- खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. **अनुमोदक :- मा.श्रीम. दिक्षा घरत सूचक :- मा.श्री. कल्पेश मानकर** **ठराव सर्वानुमते मंजूर**
23	प्रभाग समिती जी मधील वार्ड नं.88 मध्ये विविध ठिकाणी पाईप गटार पेव्हर ब्लॉक बसविणे व स्लॅब दुरुस्त करणे कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजुर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.	**ठराव :-** सदर विषयाबाबत सविस्तर चर्चा करण्यांत आली व मे. श्री. कॉन यांच्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा 17.86% कमी दराच्या निविदेस निविदा समितीने मान्यता दिली आहे. तसेच महाराष्ट्र महापालिका अधिनियम 1949 चे कलम 73 (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस मा.आयुक्त यांनी मंजूरी दिली आहे. याकामी मनपातर्फे कायदेशीर बाबींची पुर्तता करून संविदा करण्यास ही सभा मान्यता देत आहे व याकामी येणाऱ्या खर्चास अंतिम प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. **अनुमोदक :- मा.श्री.किशोर पाटील सूचक :- मा.श्री. नितीन राऊत** **ठराव सर्वानुमते मंजूर**
24	वसई विरार शहर महानगरपालिकेतील प्रभाग समिती जी वालीव प्रभाग समिती एच नवघर माणिकपूर व प्रभाग समिती आय वसई हद्दितील शालेय व महाविदयालयीन विदयार्थ्यांकरीता आंतरशालेय	**ठराव :-** वरील विषयाबाबत मा. स्थायी समिती सभेमध्ये सविस्तर चर्चा करण्यांत आली असून वसई विरार शहर महानगरपालिकामार्फत प्रभाग समिती जी.एच व आय कार्यालय हद्दीतील शालेय विद्यार्थ्यांना दिनांक 27 नोव्हेंबर 2019 ते 30 नोव्हेंबर 2019 या कालावधीत शालेय कला-क्रीडा स्पर्धांचे आयोजन करणेकामी व त्याकामी येणाऱ्या एकूण अंदाजित रूपये 40 लाख इतक्या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत

	कला क्रीडा महोत्सव 2019 चे आयोजन करणेकामी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत.	आहे. शालेय कला क्रीडा स्पर्धेचे आयोजन करणेकामी प्रस्तावात नमुद बाबीचे व त्या अनुषंगिक बाबींचे वार्षिक दर मंजूर असल्यास वार्षिक निविदाकार यांना कामाचे कार्यादेश देवून कामे करून घेण्यासाठी याचबरोबर ज्या बाबींकरीता वार्षिक दर मंजूर नाहीत अशा बांबीकरीता दरपत्रके, ई-निविदा मागविणेची कार्यवाही प्रभाग समिती स्तरावर करून घेण्यास व त्या कामाची देयके प्रभाग स्तरावरून अदा करणेस ही सभा आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे. तसेच शालेय कला-क्रीडा स्पर्धाकरीता प्रस्तावात नमुद पंच, परिक्षक यांनी प्रती दिवस व्यक्ती मानधन, देण्यांत यावे व त्याकामी अग्रीम घेवून संबंधितांस मानधन रोखीने अदा करावे याकामी येणाऱ्या खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे. **अनुमोदक :- मा.श्री.कल्पेश मानकर सूचक :- मा.श्री. नितीन राऊत** **ठराव सर्वानुमते मंजूर**
25	**वसई विरार शहर महानगरपालिकेकरीता Dewatering Pump खरेदी करणे कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.**	**ठराव :-** सदर विषयाबाबत सविस्तर चर्चा करण्यांत आली व मे एम.आय. ट्रेडींग ऍण्ड जनरल सप्लायर यांच्या रू. 7,65,000/- (प्रती नग) दरास निविदा समितीने मान्यता दिली आहे. तसेच महाराष्ट्र महापालिका अधिनियम 1949 चे कलम 73 (क) अन्वये ह्या लघुत्तम दराच्या निविदेस मा.आयुक्त यांनी मंजूरी दिली आहे. याकामी मनपातर्फे कायदेशीर बाबींची पुर्तता करून 8 पंप खरेदी करण्यास ही सभा मान्यता देत आहे व याकामी येणाऱ्या खर्चास अंतिम प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. **अनुमोदक :- मा.श्रीम.दिक्षा घरत सूचक :- मा.श्री. पंकज ठाकूर** **ठराव सर्वानुमते मंजूर**
26	**प्रभाग समिती एफ धानिव /पेल्हार क्षेत्रातील संतोष भुवन येथे गुलाब यादव प्लॉट ते कारगील मुख्य नाल्यापर्यत आर.सी.सी. नाला बांधणे. कामी या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजुर करुन संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत.**	**ठराव :-** सदर विषयाबाबत सभागृहात साधक-बाधक चर्चा करण्यांत आली. सदर कामी मे. धनेश्वर भोईर यांची निविदा अंदाजपत्रकीय दराच्या ही प्राप्त निविदामध्ये लघुत्तम दराची आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चो कलम 73 (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देण्याकरीता मा.आयुक्त ह्यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. मा.आयुक्त याचे शिफारशीनुसार मा.स्थायी समिती महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73 (क) अन्वये संविदा करणेस ही सभा मान्यता देत आहे. त्यानुसार येणाऱ्या खर्चास व त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास ही सभा मान्यता देत आहे. **अनुमोदक :- मा.श्रीम. दिक्षा घरत सूचक :- मा.श्री. किशोर ना.पाटील** **ठराव सर्वानुमते मंजूर**

27	**प्रभाग समिती एफ धानिव/पेल्हार क्षेत्रातील कारगील येथे सुमेर यादव हॉटेल जवळ आर.सी.सी. बॉक्स कल्वर्ट बांधणे कामी या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजुर करुन संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत.**	**ठराव :-** सदर विषयाबाबत सभागृहात साधक-बाधक चर्चा करण्यांत आली. सदर कामी मे. एच व्ही कन्स्ट्रक्शन यांची निविदा अंदाजपत्रकीय दराच्या ही प्राप्त निविदामध्ये लघुत्तम दराची आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चो कलम 73 (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देण्याकरीता मा.आयुक्त ह्यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. मा.आयुक्त याचे शिफारशीनुसार मा.स्थायी समिती महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73 (क) अन्वये संविदा करणेस ही सभा मान्यता देत आहे. त्यानुसार येणाऱ्या खर्चास व त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास ही सभा मान्यता देत आहे. **अनुमोदक :- मा.श्रीम. दिक्षा घरत सूचक :- मा.श्री. किशोर ना.पाटील** **ठराव सर्वानुमते मंजूर**
28	**प्रभाग समिती एफ धानिव/पेल्हार क्षेत्रातील संतोष भुवन अवधुत विद्यालय ते शुक्ला कंपाऊंड पर्यंत आर.सी.सी नाला बांधणे कामी या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजुर करुन संविदा करणे मान्यता मिळणेबाबत.**	**ठराव :-** सदर विषयाबाबत सभागृहात साधक-बाधक चर्चा करण्यांत आली. सदर कामी मे. एच.व्ही.कन्स्ट्रक्शन यांची निविदा अंदाजपत्रकीय दराच्या ही प्राप्त निविदामध्ये लघुत्तम दराची आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चो कलम 73 (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देण्याकरीता मा.आयुक्त ह्यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. मा.आयुक्त याचे शिफारशीनुसार मा.स्थायी समिती महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73 (क) अन्वये संविदा करणेस ही सभा मान्यता देत आहे. त्यानुसार येणाऱ्या खर्चास व त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास ही सभा मान्यता देत आहे. **अनुमोदक :- मा.श्रीम. दिक्षा घरत सूचक :- मा.श्री. किशोर ना.पाटील** **ठराव सर्वानुमते मंजूर**
29	**प्रभाग समिती एफ धानिव/पेल्हार क्षेत्रातील संतोष भुवन येथे धनंजय प्लॉट ते अशोक सिंग घरापर्यंत आर.सी.सी नाला बांधणे कामी या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजुर करुन संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत.**	**ठराव :-** सदर विषयाबाबत सभागृहात साधक-बाधक चर्चा करण्यांत आली. सदर कामी मे. बाबा कन्स्ट्रक्शन यांची निविदा अंदाजपत्रकीय दराच्या ही प्राप्त निविदामध्ये लघुत्तम दराची आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चो कलम 73 (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देण्याकरीता मा.आयुक्त ह्यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. मा.आयुक्त याचे शिफारशीनुसार मा.स्थायी समिती महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73 (क) अन्वये संविदा करणेस ही सभा मान्यता देत आहे. त्यानुसार येणाऱ्या खर्चास व त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास ही सभा मान्यता देत आहे. **अनुमोदक :- मा.श्रीम.दिक्षा घरत सूचक :- मा.श्री. किशोर ना.पाटील** **ठराव सर्वानुमते मंजूर**

30	**प्रभाग समिती एफ धानिव/पेल्हार क्षेत्रातील धनंजय प्लॉट अखिलेश दुबे ते मौर्या कीराणा स्टोअर पर्यत आर.सी.सी पाईप गटार करणे कामी या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजुर करुन संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत.**	**ठराव :-** सदर विषयाबाबत सभागृहात साधक-बाधक चर्चा करण्यांत आली. सदर कामी मे. एम.जे.कन्स्ट्रक्शन यांची निविदा अंदाजपत्रकीय दराच्या ही प्राप्त निविदामध्ये लघुत्तम दराची आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चो कलम 73 (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देण्याकरीता मा.आयुक्त ह्यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. मा.आयुक्त याचे शिफारशीनुसार मा.स्थायी समिती महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73 (क) अन्वये संविदा करणेस ही सभा मान्यता देत आहे. त्यानुसार येणाऱ्या खर्चास व त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास ही सभा मान्यता देत आहे. **अनुमोदक :- मा.श्रीम. दिक्षा घरत सूचक :- मा.श्री. कल्पेश मानकर** **ठराव सर्वानुमते मंजूर**
31	**सन 2019-20, सन 2020-21 व सन 2021-22 हया त्रैवार्षिक वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती A,B,C,D,E,F,G,H,I मधील गटारावर, फुटपाथवर व मुख्य रस्त्यावर विविध व्यासाची फायबर झाकणे पुरविणे व बसविणे.**	**ठराव :-** सदर कामास मा.सर्वसाधारण सभा ठराव/विषय क्र.13 दि.19/12/2018 रोजी आर्थिक व प्रशासकिय मान्यता देण्यात आली आहे. सदर कामाची जाहिर निविदा प्रसिध्द करुन सकारात्मक दृष्ट्या पाहता सन 2019-20,सन 2020-21 व सन 2021-22 करीता मे.राठोड भाग्यजीत ऍन्ड कंपनी, मे साईगणेश एंटरप्रायजेस (प्रो.श्री.दिनेश घरत), मे.अनायडा एंटरप्रायजेस, मे.ब्युकॉन इंजि.ऍन्ड इन्फ्रा प्रा.लि. व मे.बालाजी कंस्ट्रक्शन भरलेले दर (वाटाघाटी अंती) योग्य व कमी असून मंजुर करण्यात येत आहे. तसेच सदर दराने निविदेमध्ये सहभाग घेतलेले अन्य निविदाधारक काम करण्यास इच्छुक असल्यास त्यांची पॅनलवर नियुक्ती करुन घेणेकरीता दि.01/03/2019 रोजी पत्र देण्यात आले असून मे.राठोड भाग्यजीत ऍन्ड कंपनी ह्यांनी आपल्या दि.01/03/2019 रोजीच्या लेखी पत्राद्वारे सन 2019-20, सन 2020-21 व सन 2021-22 करीता निविदेमधील सर्व बाबी करीताच्या दराने काम करणेस तयारी दर्शविली आहे. मे.साईगणेश एंटरप्रायेजेस (प्रो.श्री.हिंदकुमार यादव) ह्यांनी आपल्या दि.01/03/2019 रोजीच्या पत्राद्वारे सन 2019-20, सन 2020-21 व सन 221-22 करीता निविदेमधील सर्व बाबी करीताच्या दराने काम करणेस तयारी दर्शविली आहे. मे.अनायडा एंटरप्रायजेस ह्यांनी आपल्या दि.01/03/2019 रोजीच्या लेखी पत्राद्वारे सन 2019-20, सन 2020-21 व सन 2021-22 करीता निविदेमधील सर्व बाबी करीताच्या दराने कमी करणेस तयारी दर्शविली आहे. मे.ब्युकॉन इंजि.ऍन्ड इन्फ्रा प्रा.लि. ह्यांनी आपल्या दि.01/03/2019 रोजीच्या लेखी पत्राद्वारे सन 2019-20, सन 2020-21 व सन 2021-22 करीता निविदेमधील सर्व बाबी करीताच्या दराने काम करणेस तयारी दर्शविली आहे. मे.बालाजी कंस्ट्रक्शन्स ह्यांनी आपल्या दि.01/03/2019 रोजीच्या लेखी पत्राद्वारे सन 2019-20, सन 2020-21 व सन 2021-22 करीता निविदेमधील सर्व बाबी करीताच्या दराने काम करणेस तयारी दर्शविली आहे. मे.आशिर्वाद कंस्ट्रक्शन ह्यांनी आपल्या दि.02/03/2019 रोजीच्या लेखी पत्राद्वारे सन

		2019-20, सन 2020-21 व सन 2021-22 करीता निविदेमधील सर्व बाबी करीताच्या दराने काम करणेस तयारी दर्शविली आहे. मे.श्री.साईदत्त कंस्ट्रक्शन ह्यांनी आपल्या दि.02/03/2019 रोजीच्या लेखी पत्राद्वारे सन 2019-20, सन 2020-21 व सन 2021-22 करीता निविदेमधील सर्व बाबी करीताच्या दरने काम करणेस तयारी दर्शविली आहे. मे.साईगणेश एंटरप्रायजेस (प्रो.श्री.दिनेश घरत) ह्यांनी आपल्या दि.05/03/2019 रोजीच्या लेखी पत्राद्वारे सन 2019-20, सन 2020-21 व सन 2021-22 करीता निविदेमधील सर्व बाबी करीताच्या दराने काम करणेस तयारी दर्शविली आहे मे.संजय कंस्ट्रक्शन ह्यांनी आपल्या दि.05/03/2019 रोजीच्या लेखी पत्राद्वारे सन 2019-20, सन 2020-21 व सन 2021-22 करीता निविदेमधील सर्व बाबी करीताच्या दराने काम करणेस तयारी दर्शविली आहे. मे.नितेश मोहन मलवानी ह्यांनी आपल्या दि.05/03/2019 रोजीच्या लेखी पत्राद्वारे सन 2019-20, सन 2020-21 व सन 2021-22 करीता निविदेमधील सर्व बाबी करीताच्या दराने काम करणेस तयारी दर्शविली आहे. मे.कैलासपती कंस्ट्रक्शन ह्यांनी आपल्या दि.05/03/2019 रोजीच्या लेखी पत्राद्वारे सन 2019-20, सन 2020-21 व सन 2021-22 करीता निविदेमधील सर्व बाबी करीताच्या दराने काम करणेस तयारी दर्शविली आहे. तरी त्यांना सदर पॅनलवर समाविष्ट करण्यात येत असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73(क)/(ड) अन्वये या कमी दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देणे करीता मा.आयुक्त यांनी मा.स्थायी समिती सभेपुढे शिफारस केली आहे. मा.आयुक्त यांच्या शिफारशीनुसार संविदा करणेस ही सभा मान्यता देत आहे. **अनुमोदक :- मा.श्री. किशोर पाटील सूचक :- मा.श्री. पंकज ठाकूर** **ठराव सर्वानुमते मंजूर**
32	**सन2019-20, सन2020-21 व सन2021-22 हया वित्तीय वार्षीक वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती A,B,C,D,E,F,G,H,I मधील रस्त्यावरील खड्डे बुजविणे, डागडुजी वैगेरे करणे.**	**ठराव :-** सदर कामास मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.12 दि.15/11/2018 रोजी आर्थिक व प्रशासकिय मान्यता दिली आहे सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करुन सकारात्मक दृष्ट्या पाहता सन 2019-20 या वित्तीय वर्षामध्ये मे.चंदना कंस्ट्रक्शन ह्यांनी अनु क्र.2,7(अ), 7(बी) करिता, तरी मे चंदना कंस्ट्रक्शन, मे.दक्ष एन्टरप्रायजेस, मे.साई गणेश एंटरप्रायजेस, यांचे सन 2019-20 करिताचे प्राप्त दर (वाटाघाटीअंती) योग्य व कमी असुन मंजूर करणेकरिता शिफारस करण्यात येत आहे. सदर कमी दराची निविदा मंजूरीस्तव सादर. तसेच सदर दराने निविदेमधील सहभाग घेतलेले अन्य निविदाधारक काम करण्यास इच्छुक असल्यास त्यांची पॅनलवर नियुक्ती करुन घेणेकरिता दि.22/02/2019 रोजी पत्र देण्यात आले होते. तरी सदर पत्रास अनुसरुन मे.चंदना कंस्ट्रक्शन, मे.दक्ष एन्टरप्रायजेस, मे.साई गणेश एन्टरप्रायजेस, मे.जिजाऊ कंस्ट्रक्शन, व मे.राठोड भाग्यजीत ऍन्ड कंप ह्यांनी आपल्या दि.22/02/2019 रोजीच्या लेखी पत्राद्वारे निविदेमधील सर्व बाबीच्या दराकरीता कमी करणेस तयारी दर्शवली आहे. तसेच

		महापालिकेमार्फत सदर कामाचा दोषदायित्व कालावधी (DLP) 5 वर्षे होता परंतु राज्यशासनाचा दि.14/01/2019 रोजी शासन निर्णय क्र.संकीर्ण-2018/प्र.क्र.151/इमारती -2 अन्वये दोषदायित्व कालावधी (DLP) नव्याने जाहीर केलेला आहे. सदर निर्णय पृष्ठ क्र.2 वरील (ब) रस्ते ह्यामधील अनु क्र.1 डांबरीकरण मधील 1.5 मध्ये दिल्याप्रमाणे (भागाभागात paches of MPM/BM/DBM चा एक थर व त्यावर पुर्ण लांबीत BC/OGC चा थर) उपरोक्त कामाचा दोषदायित्व कालावधी (DLP) हा दोन वर्षाचा आहे. तसेच पृष्ठ क्र.3 वरील अनु क्र.4 मधील रस्ते किरकोळ तरी मे.चंदना कंस्ट्रक्शन, मे.दक्ष एन्टरप्रायजेस, मे.साईगणेश एन्टरप्रायजेस यांचे सन 2019-20 करिताचे प्राप्त दर (वाटाघाटी अंती) योग्य व कमी असुन मंजूर करणेकरिता शिफारस करण्यात येत आहे. सदर कमी दराची निविदा मंजूरीस्तव सादर. तसेच सदर दराने निविदेमधील सहभाग घेतलेले अन्य निविदाधारक काम करण्यास इच्छुक असल्यास त्यांची पॅनलवर नियुक्ती करुन घेणेकरिता दि.22/02/2019 रोजी पत्र देण्यात आले होते. तरी सदर पत्रास अनुसरुन मे.चंदना कंस्ट्रक्शन, मे.दक्ष एन्टरप्रायजेस, मे.साईगणेश एन्टरप्रायजेस, मे.जिजाऊ कंस्ट्रक्शन, व मे.राठोड भाग्यजीत ऍन्ड कंप ह्यांनी आपल्या दि.22/02/2019 रोजीच्या लेखी पत्राद्वारे निविदेमधील सर्व बाबीच्या दराकरीता काम करणेस तयारी दर्शवली आहे. तसेच महानगरपालिकेमार्फत सदर कामाचा दोषदायित्व कालावधी (DLP) 5 वर्षे होता परंतु राज्यशासनाचा दि.14/01/2019 रोजी शासन निर्णय क्र.संकीर्ण-2018/प्र.क्र.151/इमारती-2 अन्वये दोषदायित्व कालावधी (DLP) नव्याने जाहीर केलेला आहे. सदर निर्णय पृष्ठ क्र.2 वरील (ब) रस्ते ह्यामधील अनु क्र.1 डांबरीकरण मधील 1.5 मध्ये दिल्याप्रमाणे (भागाभागात paches of MPM/BM/DBM चा एक थर व त्यावर पुर्ण लांबीत BC/OGC चा थर) उपरोक्त कामाचा दोषदायित्व कालावधी (DLP) हा दोन वर्षाचा आहे. तसेच पृष्ठ क्र.3 वरील अनु क्र.4 मधील रस्ते किरकोळ दुरुस्ती मधील 4.1 मध्ये दिल्याप्रमाणे (डांबर मिश्रीत खडीने खड्डे भरणे, चुना गेरु रंगविणे) याचा दोषदायित्व कालावधी (DLP) (डिसेंबर ते जुन) नजीकच्या पावसाळ्यापर्यंत) असा आहे. तरी सदर कामी (DLP) दोषदायित्व कालावधी सन 2019-20 करिता 5 वर्षे तसेच सन 2020-21 व सन 2021-22 करिता 5 वर्ष ऐवजी 2 वर्षे करणे उचित आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73(क) अन्वये या कमी दराच्या निविदेस संविदा करणेस देणेकरिता मा.आयुक्त यांनी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस केली आहे. मा.आयुक्त यांच्या शिफारशीनुसार संविदा करणेस ही सभा मान्यता देत आहे. अनुमोदक :- **मा.श्री. किशोर पाटील** **सूचक :- मा.श्री. पंकज ठाकूर** **ठराव सर्वानुमते मंजूर**

33	**सन 2019-20 सन 2020-21 व सन 2021-22 या त्रैवार्षिक वर्षाकरिता वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती A,B,C,D,E,F,G,H,I मधील फुटपाथ, डिव्हायडर्स व कर्ब स्टोन दुरुस्तीवगैरे कामे करणे.**	**ठराव :-** सदर कामास मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र. 12 दि. 19/12/2018 रोजी आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यांत आली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करून सकारात्मकदृष्ट्या पाहता सन 2019-20 करीता मे. आशिर्वाद कन्स्ट्रक्शन यांनी निविदेमध्ये अनुक्रमांक 1,6,10,14,16 व 17 करीताचे दर मे.श्री. सद्गुरू कन्ट्रक्शन यांनी निविदेमधील अनु. 5 व 8 करीताचे दर मे. शशिकांत राजहंस यांनी निविदेमधील अनु. 3,9,12 व 15 करीताचे दर मे. ब्युकॉन इन्फ्रा. यांनी निविदेमधील अनु. 4 करीताचे दर मे. नितेश मोहन मलवानी यांनी निविदेतील अनु. 2,7 व 11 करीताचे दर वाटाघाटीअंती योग्य व कमी आहेत. तसेच सन 2019-20 मध्ये मे.श्री. साईदत्त कन्स्ट्रक्शन व मे. नितेश मोहन मलवानी यांनी सदरचे दर वाटाघाटीने कमी करून दिले असून त्यांचे निविदा दर मंजूर करण्यांत येत आहेत. सदर कामी निविदेनुसार मागविण्यात आलेले दर 3 वर्षाकरीता असल्याने मे. आशिर्वाद कन्स्ट्रक्शन मे.नितेश मोहन मलवानी, मे. शशिकांत राजहंस, मे. श्री. सद्गुरू कन्स्ट्रक्शन, मे.श्री. साईदत्त कन्स्ट्रक्शन व मे. संजय कन्स्ट्रक्शन यांच्या मार्फत भरणेंत आलेल्या सन 2019-20, सन 2020-21 व सन 2021-22 च्या दरांपैकी केवळ सन 2019-20 करीता भरलेल्या दरांची चालू दर सूचि (SSR सन 2018-19 नुसार तुलना करण्यांत आली असून सदरचे दर (वाटाघाटीअंती) योग्य व वाजवी आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून नविन (SSR/ दरसुची) निर्गमित झाल्यानंतर मे. आशिर्वाद कन्स्ट्रक्शन मे.नितेश मोहन मलवानी, मे. शशिकांत राजहंस, मे. श्री. सद्गुरू कन्स्ट्रक्शन, मे.श्री. साईदत्त कन्स्ट्रक्शन व मे. संजय कन्स्ट्रक्शन यांनी सन 2020-2021 व सन 2021-22 करीता भरलेल्या दरांची नविन SSR दरसुचीनुसार तुलना करून पुढील दोन वर्षाकरीताचे दर वाटाघाटीने निश्चित करून पुढील कामाचे आदेश देणे उचित व योग्य ठरेल. तसेच नविन SSR/दरसुची प्रसिध्द होईपर्यंत चालू वर्षाच्या दरसुचीनुसार दर लागू राहिल. तरी मे. आशिर्वाद कन्स्ट्रक्शन मे.नितेश मोहन मलवानी, मे. शशिकांत राजहंस, मे. श्री. सद्गुरू कन्स्ट्रक्शन, मे. संजय कन्स्ट्रक्शन व मे. ब्युकॉन इंजिनिअर्स ऍण्ड इन्फ्रा. प्रा.लि. यांचे सन 2019 करीताचे प्राप्त दर (वाटाघाटी अंती) योग्य व कमी असून मंजूर करण्यांत येत आहेत. तसेच सदर दराने निविदेमधील सहभाग घेतलेले अन्य निविदाधारक काम करण्यांस इच्छुक असल्यास त्यांची पॅनलवर नियुक्त करून घेण्याकरीता दि. 11/02/2019 रोजी पत्र देण्यांत आले होते. तरी सदर पत्रास अनुसरून मे. अनायडा एन्टरप्रायजेस यांनी आपल्या दि. 18/02/2019 रोजीच्या पत्राद्वारे निविदेमधील अ.क्र. 1,2,3,4,6,10,11,12,14,15 व 16 करीताच्या दराने काम करणेस तयारी दर्शविली आहे. तसेच अ.क्र. 5,7,8,9,13 व 15 करीताच्या दराने काम करणेस असमर्थतता दर्शविली आहे. मे. निलेश मलवानी यांनी आपल्या दि. 21/02/2019 रोजीच्या पत्राद्वारे निविदेमधील अ.क्र. 1,2,3,4 5,6,7,10,11,14 व 15 करीताच्या दराने काम करणेस तयारी दर्शविली आहे. तसेच अ.क्र. 8,9,12,13 व 17 करीताचे दराने काम करणेस असमर्थतता दर्शविली आहे. मे. शशिकांत एस. राजहंस यांनी आपल्या दि. 21/02/2019 रोजीच्या

		पत्राद्वारे निविदेमधील अ.क्र. 1,2,3,4,5,6,9,10,11,12,14,15,16 व 17 करीताच्या दराने काम करणेस तयारी दर्शविली आहे. तसेच अ.क्र. 7,8 व 13 करीताचे दराने काम करणेस असमर्थतता दर्शविली आहे. मे.श्री. साईदत्त कन्स्ट्रक्शन यांनी आपल्या दि. 21/02/2019 रोजीच्या पत्राद्वारे निविदेमधील अ.क्र. 1,2,3,4,5,6,7,10,11,14,15 व 16 करीताचे दराने काम करणेस तयारी दर्शविली आहे. तसेच अ.क्र. 8,9,12,13 व 17 करीताचे दराने काम करणेस असमर्थतता दर्शविली आहे. मे.श्री. सद्गुरू कन्स्ट्रक्शन यांनी आपल्या दि. 21/02/2019 रोजीच्या पत्राद्वारे निविदेमधील अ.क्र. 1,2,3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14, 16 व 17 करीताचे दराने काम करणेस तयारी दर्शविल आहे. अ.क्र. 13 करीताच्या दराने काम करणेस असमर्थतता दर्शविली आहे. मे. श्री. गणेश एंटरप्रायजेस यांनी आपल्या दि. 21/02/2019 रोजीच्या पत्राद्वारे निविदेमधील अ.क्र. 1,2,3,4,5,6,7,8,9,10,11,14,15 व 16 करीताच्या दराने काम करणेस तयारी दर्शविली आहे. तसेच अ.क्र. 7,8,9,12,13 व 17 करीताचे दराने काम करणेस असमर्थतता दर्शविले आहे. मे. संजय कन्स्ट्रक्शन यांनी आपल्या दि. 22/02/2019 रोजीच्या पत्राद्वारे निविदेमधील अ.क्र. 1,2,3,4,5,6,10,11,13,14,15 व 16 करीताचे दराने काम करणेस तयारी दर्शविली आहे. तसेच अ.क्र. 7,8,9,12 व 17 करीताचे दराने काम करणेस असमर्थतता दर्शविलेली आहे. मे.ओमकार कन्ट्रक्शन यांनी आपल्या दि. 22/02/2019 रोजीच्या पत्राद्वारे निविदेमधील अ.क्र. पत्रातील 1,2,3,4,5,6,10,11,14,15 व 16 करीताच्या दराने काम करणेस तयारी दर्शविली आहे. तसेच अ.क्र. 7,8,9,12,13 व 17 करीताच्या दराने काम करणेस असमर्थतता दर्शविले आहे. मे. ब्युकॉन इंजिनिअर्स ऍण्ड इन्फ्रस्ट्रक्चर प्रा.लि. यांनी आपल्या दि. 25/02/2018 रोजीच्या पत्राद्वारे निविदेमधील अ.क्र. 1,2,3,4,5,6,10,11,13,14,15 व 16 करीताच्या दराने काम करणेस तयारी दर्शविली आहे. तसेच अ.क्र. 7,8,9,12 व 17 करीताच्या दराने काम करणेस असमर्थतता दर्शविली आहे. मे आशिर्वाद कन्स्ट्रक्शन यांनी आपल्या दि. 25/02/2019 रोजीच्या पत्राद्वार निविदेमधील अ.क्र. 1,2,3,4,5,6,9,10,11,12,15,16 व 17 करीतच्या दराने काम करणेस तयारी दर्शविली आहे. तसेच अ.क्र.7,8 व 13 करीताच्या दराने काम करणेस असमर्थतता दर्शविली असून त्यांनाही सदर पॅनलवर समाविष्ट करण्यात येत असून महराष्ट महानगरपालिका 1949 चे कलम 73 (क) / (ड) अन्वये या कमी दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देणेकरीता मा.आयुक्त यांनी मा.स्थायी समितीपुढे शिफारस केली आहे. मा.आयुक्त यांच्या शिफारशीनुसार संविदा करणेस ही सभा मान्यता देत आहे. **अनुमोदक :- मा.श्री. किशोर पाटील सूचक :- मा.श्री. पंकज ठाकूर** **ठराव सर्वानुमते मंजूर**

34	**वसई विरारशहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती जी मधील वॉर्ड क्र.115 मध्ये जुचंद्र येथे समाजमंदिर बांधणे कामी प्राप्त निविदापैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.**	**ठराव :-** सदर विषयाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली व मे. पार्श्व कॉर्पोरेशन यांच्या 3.60% जादा दराच्या निविदेस मान्यता देण्यांत येत असून मे. पार्श्व कॉर्पोरेशन यांच्याशी कामाची संविदा करण्यास ही सभा मंजूरी देत आहे. **अनुमोदक :- मा.श्री. किशोर पाटील सूचक :- मा.श्री. पंकज ठाकूर** **ठराव सर्वानुमते मंजूर**

नगरसचिव
वसई विरार शहर महानगरपालिका